# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर  वर्ष ३ रे  अंक १६८ वा  शुक्रवार दि.०१ डिसेंबर २०२३  पृष्ठे ४  स्वागत मूल्य २ रू.


## लातूर, धाराशीव जिल्ह्यातील भूकंपग्रस्तांच्या समस्या सोडवण्यास प्राधान्य द्या - विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचे निर्देश



मुंबई :- लातूर, धाराशीव जिल्ह्यातील भूकंपग्रस्तांच्या समस्या व प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडवण्यासाठी संबधित विभागांनी प्राधान्य द्यावे. या कामासाठी निश्चित कालमर्यादा अखून त्या नुसार कार्यवाही करावी, असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज दिले. लातूर आणि धाराशीव जिल्ह्यातील भूकंपग्रस्तांच्या समस्यांबाबत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनात बैठक संपन्न झाली. बैठकीस आमदार अभिमन्यू पवार व ज्ञानराज चौगुले, मदत व पुनर्वसन उप सचिव श्री. सत्यनारायण बजाज, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, वन विभागाचे अवर सचिव गणेश जाधव यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी व लातूर आणि धराशीव जिल्ह्यातील भूकंपग्रस्तांचे प्रतिनिधी उद्धव काळे, रविराज चव्हाण, वैभव पवार, फजल कादरी, बाळाजी पवार, सुरेश पवार, सुनील माने, युसूफ पठाण, जीवन मांडे उपस्थित होते.

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, सन १९९३ मध्ये किल्लारी येथे झालेल्या या विनाशकारी भूकंपाला तीस वर्षे पूर्ण झाली आहेत. अद्यापही भूकंपग्रस्तांचे काही प्रश्न प्रलंबित आहेत. हे प्रश्न, समस्या सोडवण्यास जिल्हा प्रशासनाने व शासनाने अधिक गती देणे आवश्यक आहे. भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनसाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत त्या शेतकऱ्यांना वाणिज्य वापरासाठी भूखंड वाटप करण्यापूर्वी प्रत्येक गावात किती भूखंड शिल्लक आहेत याची पडताळणी करून त्या बाबतचा प्रस्ताव संबधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी शासनास सादर करावा. तसेच आजही त्या भागात भूकंपाचे धक्के बसत आहेत. जर त्याठिकाणी भूकंपाचा तीन स्केल पेक्षा मोठा धक्का असेल तर त्याभागातील लोकांना मदत आणि पुनर्वसन विभागामार्फत छळ्ळ्ळ च्या निकषांचा अभ्यास करून मदत दिली जावी असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. अद्यापही जी मुले शिक्षणापासून वंचित आहेत त्यांच्यासाठी निश्चितच शासनाच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील असे त्यांनी सांगितले.

मालकी हक्काने वाटप केलेल्या दुकानांच्या हस्तातरणांबबत ज्या पद्धतीने शासन निर्णय घेण्यात आला आहे त्याच पद्धतीने भूकंप बधितांच्या घरांच्या हस्तातरणांबाबत निर्णय घेण्याबाबत कार्यवाही व्हावी. भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसित वसाहतीमध्ये आवश्यक पायाभूत सुविधांसाठीचा प्रस्ताव सादर करावा. गढीबाधित भूकंपग्रस्तांना भूकंपग्रस्त प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाच्या पुनर्वसन विभागाने कार्यवाही करावी, ८ व्या व ९ व्या फेरीत घरे वाटप,घरे पुनर्बांधणी, पाणी पुरवठा योजना विद्युत पंपास स्वतंत्र रोहित्र बसवणे यांचा ही आवश्यक बाबींचा प्रस्ताव सादर करावा, असेही उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी बैठकीत सूचित केले. भूकंप बाधित गावांमध्ये अद्यापि भूकंपामुळे काय परिणाम जाणवत आहेत याबाबतचा अभ्यास करून त्यावर काय उपाय योजना करता येतील याचा अहवाल सादर करावा. तसेच या गावातील महिलांसाठी जिल्हा परिषदेमार्फत वेगळा उपक्रम सुरू करणे, भूकंपग्रस्तांच्या वसाहतीमध्ये सुविधांसाठी उडठ फंडातून निधी मिळणे बाबत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी बैठकीत दिल्या.

## वायू प्रदूषणामुळे दरवर्षी २० लाख लोकांचा मृत्यू

नवी दिल्ली : भारतात दरवर्षी वीस लाखांहून अधिक लोकांचा वायू प्रदूषणामुळे मृत्यू होतो. एका रिसर्च जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासात ही बाब समोर आली आहे. भारतापेक्षा केवळ चीनमध्येच वायू प्रदूषणामुळे जास्त मृत्यू झाले आहेत. या अभ्यासातून असेही समोर आले आहे की, औद्योगिक क्षेत्र, ऊर्जा उत्पादन आणि वाहतूक इत्यादींमध्ये जीवाश्म इंधनाचा वापर जगभरात दरवर्षी ५० लाखांहून अधिक लोकांच्या मृत्यूचे कारण बनतो.संशोधकांनी म्हटले आहे की, २०१९ मध्ये केलेल्या मूल्यांकनानुसार, वायू प्रदूषणामुळे जगभरात दरवर्षी ८३ लाख लोकांचा मृत्यू होतो. अशा परिस्थितीत, जीवाश्म इंधनाच्या वापरामुळे होणारे मृत्यू हे एकूण मृत्यूंपैकी ६१ टक्के आहेत जे स्वच्छ आणि अक्षय ऊर्जेच्या वापरामुळे टाळता येऊ शकतात. संशोधकांना असेही आढळून आले की, सुमारे ५२ टक्के मृत्यू इस्केमिक हृदयरोग, स्ट्रोक, क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह लंग डिसीज आणि मधुमेह यासारख्या सामान्य परिस्थितींशी संबंधित आहेत. तसेच, सुमारे २० टक्के मृत्यूची प्रकरणे उच्च रक्तदाब, अल्झायमर आणि पार्किन्सन रोग यांसारख्या न्यूरोडीजनरेटिव्ह विकारांशी संबंधित आहेत.संशोधकांचा असा विश्वास आहे की, जीवाश्म इंधनावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेले देश त्यांचा वापर टाळून दरवर्षी सुमारे ४.६ लाख मृत्यू टाळू शकतात. तसेच संयुक्त अरब अमिरातीमध्ये सुरू असलेली सीओपी २८ हवामान बदलाची चर्चा, जीवाश्म इंधन टप्प्याटप्प्याने बंद करण्याच्या दिशेने बर्याच प्रमाणात प्रभावी ठरू शकते. जगभरात असे मार्ग शोधले जात आहेत जेणेकरून जीवाश्म इंधन कमीत कमी वापरला जाईल.

## शिवली-भादा-उटी रस्त्यासाठी आ. कराड यांच्या प्रयत्नातून १३ कोटी ५९ लक्ष रुपयाचा निधी मंजूर




लातूर :- लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भादा सर्कल मधील शिवली - भादा - शिंदेवाडी - उटी या साडेनऊ किलोमीटर रस्त्याच्या कामासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ अंतर्गत भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून १३ कोटी ५९ लक्ष ७४ हजार रुपये निधी मंजूर झाला आहे.

भादा सर्कल मधील रामा ६८ ते शिवली - भादा - शिंदेवाडी - उटी दरम्यानचा रस्ता अत्यंत खराब झाल्याने त्याचा वाहनधारकासह त्या परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने सदरील रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून व्हावे याकरिता भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री मा. ना. गिरीशजी महाजन यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता.

आ. कराड यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून सदरील ९.६ किलोमीटर रस्त्याच्या कामासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ संशोधन व विकास अंतर्गत रस्त्याच्या कामासाठी १२ कोटी ८२ लक्ष ९ हजार रुपये रुपये आणि सदरच्या रस्त्याची पाच वर्ष नियमित देखभाल व दुरुस्ती करिता ७७ लक्ष ६५ हजार रुपये असे एकूण १३ कोटी ५९ लक्ष ७४ हजार रुपयांचा निधी २९ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या शासन निर्णय परिपत्रकानुसार मंजूर झाला आहे.

रामा-६८ ते शिवली - भादाज - शिंदेवाडी - उटी रस्त्याच्या कामाला निधी मंजूर करून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे पद्माकर चिंचोलकर, सोमनाथअप्पा पावले, बालाजी शिंदे, सतिश कात्रे, भालचंद्र पाटील, सुनिल सुरवसे, योगेश लटूरे, गुणवंत करंडे, राजकीरण साठे, फुलचंद अंधारे, महादेव मुळे, रविंद्र पाटील, राम पटणे, अशोक वीर, अक्षय भोसले, वाजीद पठाण, बालाजी साळूंके, श्रीराम जावळेजावळे, नागराज रिंगणकर यांच्यासह त्या त्या गावातील आणि परिसरातील भाजपाच्या कार्यकर्ते आणि नागरिकांनी आभार व्यक्त केले आहेत.

## ''भुजबळ साहेब वयाने मोठे आहेत, त्यांना विनंती...'', सुप्रिया सुळेंचा छगन भुजबळांना सल्ला



मुंबईः मराठा आरक्षणावरुन मागच्या काही दिवसांपासून वातावरण पेटलेलं आहे. छगन भुजबळ आणि मनोज जरांगे यांचे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. ओबीसींच्या आतापर्यंत दोन सभा झालेल्या आहेत. दोन्ही सभांमध्ये उपस्थित वक्त्यांनी भडकाऊ भाषणं केल्याचं दिसून आलं. त्या अनुषंगाने सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली.राज्यामध्ये मराठा आरक्षणावरुन वातावरण चिघळण्याची शक्यता आहे. त्यावर प्रतिक्रिया देताना आणि छगन भुजबळ यांना सल्ला देताना सप्रिया सुळे म्हणाल्या की, भुजबळ साहेब वयाने- कर्तृत्वाने मोठे आहेत.. त्यांच्याकडे विनम्रपणे मागणी करते, गैरसमज नसावा.. मला प्रांजळपणे सांगायचंय- जी आपली मागणी आहे आणि ती ज्या व्यासपीठावर करता ती बंद दरवाजामागे किंवा कॅबिनेटमध्ये केली तर बरं होईल.सुळे पुढे म्हणाल्या की, महाराष्ट्रामध्ये दुर्दैवी गलिच्छ राजकारण सुरूय, भुजबळांना महत्त्वाचं पद मिळालंय, त्यांनी सरकारमध्ये चर्चा करायला पाहिजे. दूषित होणाऱ्या या वातावरणाला जबाबदार खोके सरकार असून २०० आमदार असताना मंत्र्याला बोलायला बाहेरचं व्यासपीठ लागतंय, सरकारमधलं मिसमॅनेजमेंट दिसतंय; असा घणाघात सुप्रिया सुळेंना केला.काय म्हणाल्या सुप्रिया सुळे? नक्की सरकारची भूमिका काय हे स्पष्ट झालं पाहिजे निर्णयप्रक्रियेचे अधिकार मुख्यमंत्र्यांकडे आहेत तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडेही आहेत राष्ट्रवादी पक्ष मराठा, मुस्लिम, लिंगायत या सर्वांच्या मागे आहे. राज्य सरकारच्या निर्णयात स्पष्टता येत नाहीये राज्यात अनेक ठिकाणी दगडफेक होताना दिसतेय, भाजपच्या खासदारांवर ही दगडफेक झाली इंटेलिजन्स काय करतंय? वैयक्तिक माझं देवेंद्रजींशी भांडण नाही, हे भांडण वैचारिक आहे जालन्यातील घटना दुर्दैवी आहे. अमानुष पद्धतीनं महिलांना, मुलांना मारलं.. त्याला कोण जबाबदार? गृहमंत्रालय काय करतंय?

## शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

लातूर : लातूर ग्रामीण मतदारसंघातील लातूर, रेणापूर आणि औसा तालुक्यामधील अनेक भागांत गेल्या २ दिवसांत वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाल्याने पिकांना मोठा फटका बसला आहे. ऐन दुष्काळात शेतकऱ्यांवर पुन्हा एकदा मोठे संकट कोसळले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सध्या आधाराची गरज आहे. म्हणून सरकारने तातडीने सरसकट आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी गुरुवारी केली.लातूर, रेणापूर आणि औसा तालुक्यामधील अनेक भागांत वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला आहे. त्यामुळे हरभरा, तुर, ज्वारी, गहू, ऊस यासह फळबागा व भाज्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिके भुईसपाट झाली असल्याने शेतकरी पुरता हतबल झाला आहे. एकीकडे कोरडा दुष्काळ आणि दुसरीकडे अवकाळी पाऊस अशा दुहेरी संकटात बळीराजा अडकला आहे. अशा संकटाच्या काळात





शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे, त्यांना आधार देणे गरजेचे आहे, असे आमदार श्री. धिरज देशमुख यांनी सांगितले.अधिवेशनात शेतकऱ्यांची बाजू मांडणार सरकारने शेतकरी बांधवांना गणेशोत्सव, गौरी, दसरा, दिवाळी या सणांमध्ये पीकविम्याची अग्रिम रक्कम मिळवून दिली नाही. मदत वेळेवर न मिळाल्याने शेतकऱ्यांनी सण साधेपणाने साजरे केले. दुष्काळ जाहीर झाला असला तरी याबाबतच्या सवलती अद्याप लागू झाल्या नाहीत. आता वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने शेतकऱ्यांचे स्वप्नच भुईसपाट झाले आहे. त्यामुळे आतातरी मदत वेळेवर आणि तत्पर मिळावी म्हणून शेतकऱ्यांची बाजू अधिवेशनात आम्ही मांडणार आहोत, असेही आमदार श्री. धिरज देशमुख यांनी याप्रसंगी सांगितले.

## दुसऱ्या तिमाहीत देशाचा जीडीपी ७.६ टक्के

नवी दिल्ली : उत्पादन क्षेत्राच्या चांगल्या कामगिरीमुळे चालू आर्थिक वर्षाच्या जुलै-सप्टेंबर तिमाहीत देशाचा आर्थिक विकास दर ७.६ टक्के नोंदवला गेला आहे. वर्षभरापूर्वी याच तिमाहीत विकास दर ६.२ टक्के होता. गुरुवारी जाहीर झालेल्या अधिकृत आकडेवारीत ही माहिती देण्यात आली आहे. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, दुसऱ्या तिमाहीतील सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढीचा डेटा जागतिक पातळीवर अशा कठीण काळात भारतीय अर्थव्यवस्थेची लवचिकता आणि ताकद दर्शवितो.राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या (एनएसओ) आकडेवारीनुसार, कृषी क्षेत्रातील सकल मूल्यवर्धित (जीव्हीए) वाढीचा दर १.२ टक्के आहे जो २०२२-२३ च्या जुलै-सप्टेंबर तिमाहीत २.५ टक्के होता. उत्पादन क्षेत्रातील जीव्हीए वाढीचा दर चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत १३.९ टक्के आहे, जो एका वर्षापूर्वी याच तिमाहीत ३.८ टक्क्यांनी घसरला होता.

## लोकसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच मनातले वादळ? खासदार शृंगारे यांचा पत्ता कट, अनिल ब. गायकवाड यांचीच चर्चा!



**ज्या पद्धतीने माजी खासदार सुनील ब. गायकवाड यांचा भाजप पक्षातून पत्ता कट केला त्याच पद्धतीने खा. सुधाकर शृंगारे यांचा सुद्धा यावेळेस भाजपा पक्षातून उमेदवारी कट होणार आहे.**



लातूर -लोकसभा निवडणूका जाहीर होण्यापूर्वीच लातूर लोकसभा मतदार संघातील राखीव मतदारांची संख्या त्यात राखीव जातीचे उमेदवार,मराठा- कुणबी, ओबीसी आरक्षणाचा वाद चव्हाट्यावर असतानाच कॉंग्रेस- भाजपाने उमेदवारांची चाचपणी केली असून लातूरच्या राजकीय घडामोडीत नवीनच समीकरण रुजवले जात असल्याची चर्चा होताना दिसते आहे. काल परवा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे प्रमुख अनिल ब.गायकवाड हे सेवानिवृत्त झाले असून त्यांनी त्यांचा वाढदिवस लातूर येथील हॉटेल ग्रँड येथे अति उत्साहात साजरा केला. त्यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यमान खासदार सुधाकर शृंगारे हे मात्र मागच्या रांगेत बसल्याने उपस्थितामध्ये कुजबूज सुरू झाली आणि उद्याच्या लोकसभा निवडणुकीत भाजपाचे अनिल बळीराम गायकवाड हेच उमेदवार असतील नसतील पण शृंगारे नाहीत अशीच राजकीय वर्तुळात उलट सुलट प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे. निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच मनातले वादळ कशाला अशीही चर्चा होताना दिसते आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर चैत्य स्मारक ट्रस्ट पानगाव शिष्टमंडळाने माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची घेतली भेट

लातूर /प्रतिनिधी :- रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चैत्य स्मारक ट्रस्ट शिष्टमंडळाने राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची गुरुवार दि. ३० नोव्हेंबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी भेट घेऊन ६ डिसेंबर २०२३ रोजी महापरिनिर्वाण दिनी पानगाव येथे आयोजित करावयाच्या कार्यक्रमाच्या संदर्भाने यावेळी चर्चा झाली, त्यांच्याशी विविध विषयावर झाली.यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चैत्य स्मारक ट्रस्ट पानगावचे



संस्थापक अध्यक्ष व्ही.के.आचार्य, गुलाब चव्हाण, वैभव आचार्य, माधव आचार्य,बी.एस.आचार्य आदीसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर चैत्य स्मारक ट्रस्टपानगावचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

## संपादकीय....

# ईशान्य भारताच्या 'हार्वर्ड'चा कुलगुरू !

ईशान्य भारतात राष्ट्रवादी विचारांची रुजवण करण्यासाठी अथक परिश्रम करणारे माजी राज्यपाल पद्मनाभ आचार्य यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पुण्यात पेरुगेट भावेस्कूल येथे गुरुवारी सायंकाळी (ता. ३०) सहा वाजता सभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त.हार्वर्ड विद्यापीठाच्या प्रारंभीच्या कार्यकाळाबद्दल तज्ज्ञांचा असा अभिप्राय होता की, 'इट हॅड नो मेथड, बट इट वर्क्ड'. ईशान्य भारतात काम करणाऱ्या भय्याजी काणे यांच्यासारख्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अनेक कार्यकर्त्यांच्या जीवनाबाबत 'इट हॅड हिडन मेथड, ॅड इट वर्क्ड, असे म्हणता येईल.अर्थात ही 'हिडन मेथड' ईशान्य भारतात त्याहीआधीपासून काम करीत होती.अनेक स्वयंसेवक त्यात होते. ईशान्य भागाला भारतापासून विलग करण्याचे प्रयत्न कधीही यशस्वी होणार नाहीत, अशी परिस्थिती निर्माण केली ती या कार्यकर्त्यांनी.तुलना करायची नाही, तरीही भय्याजी हे जर ईशान्य भारताच्या 'हार्वर्ड'चे प्राध्यापक मानले, तर पद्मनाभ आचार्य हे त्याचे 'कुलगुरू' मानावे लागतील. त्यांच्या निधनाची बातमी ऐकल्यानंतर हे विचार मनात आले. आचार्य यांनी त्यांनी या भागात राष्ट्रीय एकात्मतेची बिजे पेरली. ईशान्येतील विविध राज्यांचे राज्यपालपद भूषवताना आपल्या कामाचा ठसा उमटवला. पद्मनाभजी मूळचे उडुपीचे. संघाशी त्यांचा लहानपणापासून संबंध होता. नोकरी-व्यवसायासाठी ते मुंबईत आले. माटुंग्याच्या रुपारेल कॉलेजचे कॅंटिन त्यांनी चालवायला घेतले आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेकडे ते आकृष्ट झाले.मुंबई विद्यापीठात कायद्याच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. त्यांच्या नेतृत्वाखाली परिषदेच्या अनेक नव्या उपक्रमांचा प्रारंभ झाला. गुणवंत विद्यार्थीसत्कार, पुस्तकपेढी, रोजगार योजना हे त्यातील काही. यात 'साहचर्य संध्या' हा उपक्रम गाजला.महाविद्यालयांची संमेलने आणि धांगडधिंगा, धुडगूस, मारामाऱ्या हे जणू समीकरण बनते होते. त्याला विधायक, रचनात्मक संमेलनाची दिशा दिली ती या उपक्रमाने. तीन-चार हजार विद्यार्थी चार-पाच तास एका ठिकाणी जमतात, विद्यार्थी-विद्यार्थिनी एकत्र असूनही अमंगल काही घडत नाही, हे त्यांचे मोठे यश होते.१९६२च्या चिनी आक्रमणाने ईशान्य भारतातील अराष्ट्रीय शक्तींचे जे दर्शन उर्वरित भारताला झाले, त्याने अस्वस्थ झालेल्यांत पद्मनाभजीही होते. तीन-चार कार्यकर्त्यांना घेऊन ते तेथे गेले. 'इंडियन ॅड डॉग्ज गो बॅक' अशी पोस्टर पाहून ते कमालीचे अस्वस्थ झाले.यावर फार मूलभूत उपाय योजावे लागतील, हे त्यांना जाणवले. ईशान्य भारतातील तरुण पिढीचे चिन्यांनी पुरते ब्रेनवॉशिंग केलं आहे. उर्वरित भारताशी आपले काहीही नाते नाही, अशी त्यांची भावना बनली आहे, हे त्यांना या प्रवासात उमगले होते.त्यामुळे या तरुणांना विविध राज्यांत आणावे, आठ पंधरा दिवस त्यांना येथील घरा-घरात ठेवावे, भारतीय कुटुंबांमार्फत त्यांना संस्कृतीपरिचय घडवावा, अशा काही कल्पना त्यांच्या डोक्यात आकार घेत होत्या..'मेरा घर भारत देश'' या प्रकल्पाचा त्यातून जन्म झाला. या एका प्रकल्पाने विद्यार्थी परिषदेची सामाजिक-सांस्कृतिक प्रतिमा समाजमनात उंचावली. ईशान्य भारतातील शाळकरी मुलांना मुंबईत आणून काही कुटुंबांमध्ये त्यांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली.शालेय, महाविद्यालयीन शिक्षणदेखील त्या त्या कुटुंबात राहून मुले घेत राहिली आणि त्यांना मिळणारी आपुलकीची वागणूक पाहून त्यांच्या पालकांचीही पूर्वग्रहदूषित मने बदलण्याची प्रक्रिया सुरु झाली.राष्ट्रीय एकात्मतेच्या दिशेने परिषदेने टाकलेले हे पाऊल हे पद्मनाभजींची मोठी कामगिरी होती. जनकल्याण समितीमार्फत ते काम आजही जोमाने सुरू आहे. संपर्क, संभाषण, संवाद, संबंध आणि संग्रहातून संघटनेसाठी जन-मन-धन कसे मिळवायचे, हे पद्मनाभजींनी परिषदेतील अनेक पिढ्यांना शिकवले.परिषदेत विविध कार्यक्रमातून, प्रकल्पांतून चैतन्याचे वादळवारे आणले तेही पद्मनाभजींनी. १९६९ ते १९७३ अशी चार वर्ष त्यांच्या मार्गदर्शनात काम करण्याची संधी मला लाभली. ईशान्य भारतातील जनजातींच्या बोलींचा अभ्यास भारतातील विद्यापीठात व्हावा,त्यांच्यासाठी रोमनऐवजी स्थानिक लिपी उपलब्ध व्हावी यासाठी संशोधनाचा त्यांचा प्रयत्न तेव्हापासूनच राहिला. राणी माँसह दहा जनजाती नेत्यांची चरित्रे त्यांनी 'कॅडेमी फॉर इंडियन ट्रायबल डायलेक्ट्स'च्या माध्यमातून प्रसिद्ध केली. या जनजातींच्या बोलीमधील म्हणी, लोककथा, कविता यांचेही प्रकाशन त्यांनी घडवून आणले.भाजपच्या माध्यमातून कार्य भाजपशी १९८० मध्ये ते जोडले गेले. तेथेही उत्तम काम करीत ते स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत पोचले. १९९१ मध्ये भाजप राष्ट्रीय कार्यकारिणीवर त्यांची निवड झाली आणि ईशान्य भारताची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली.प्रामुख्याने अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, मिझोराम आणि नागालँडचे ते प्रभारी झाले. १९९५मध्ये पक्षाचे ते 'राष्ट्रीय सचिव' बनले. हळूहळू जबाबदाऱ्या वाढत गेल्या. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली २०१४ मध्ये भाजपचे सरकार केंद्रात आले आणि आचार्य यांच्या ईशान्येशी असणाऱ्या संबंधांची योग्य दखल घेतली गेली.१४ जुलै २०१४ ते १२ डिसेंबर २०१४ असा सहा महिन्यांचा त्रिपुराच्या राज्यपालपदाचा कार्यभार त्यांच्याकडे राहिला. १२ डिसेंबर २०१४ ला त्यांच्यावर आसामच्या राज्यपालपदाची अतिरिक्त धुरा सोपवण्यात आली; परंतु त्रिपुराची सूत्रे १९ मे २०१५ पर्यंत त्यांच्याकडे राहिलीच.
पंतप्रधान नरेंद्र मोदी ईशान्य दौऱ्यावर असताना पद्मनाभजींनी ईशान्य भारतात राबवलेल्या अनेक उपक्रमांची माहिती त्यांना दिली. त्यानंतर २०१७मध्ये अरुणाचल प्रदेशाच्या राज्यपालपदाची अतिरिक्त जबाबदारीही त्यांच्याकडे सोपविली गेली.इतक्या राज्यांच्या राज्यपालपदाची जबाबदारी स्वीकारणारे व्यक्तिमत्व एवढेच त्यांचे वेगळेपण नव्हते, तर या कार्यकाळात पार पडलेल्या जबाबदा-या अहवालरुपाने जनतेला सादर करणारा पहिला राज्यपाल अशी त्यांच्या कार्याची नोंद घेतली गेली.१९३१चा जन्म आणि १० नोव्हेंबर २०२३ ला निधन. तब्बल ९२ वर्षांचे आयुष्य त्यांना लाभले. त्यातली ७५ वर्षे त्यांनी संघ, परिषद, भाजपा आदी संस्थांमध्ये सक्रिय राहून व्यतीत केली. यथावकाश वयोमानापरत्वे पद्मनाभजी राज्यपालपदावरून निवृत्त झाले खरे;परंतु वैद्यकीय तपासण्यांच्या निमित्ताने ईशान्य भारतात डॉक्टरांना पाठवणे, शस्त्रक्रिया करण्यासाठी मुंबईतून वैद्यकीय पथके घेऊन जाणे, आयएनएफसी, ईश्वरपूरम (पुणे) पासारख्या संस्थांसाठी ईशान्य भारतातून निवडक विद्यार्थी आणणे,त्यांच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे, त्या मुलाशी त्यांच्या त्यांच्या भाषेत संवाद साधणे, नागालँड-अरुणाचल प्रदेश सरकारांकडून या प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करून देणे अशी अनेक कामे निवृत्तीनंतरही पद्मनाभजी करत राहिले.

# शासनाने शेतकरी हिताचे निर्णय लागलीच घ्यावेत!

(अवकाळी पाऊस व शेतीची हानी विशेष.)
निसर्ग बदलत आहे, तसेच पाऊस, वारे अनियमित होत आहेत, अशा वेळी शेतकर्यांना बदलांसाठी तयार करणे महत्त्वाचे आहे. भारतीय शेती अल्प भूधारकांची आहे आणि येत्या काळात यात काही बदल होण्याची शक्यता नाही आणि हाच भूधारक निसर्गाच्या कोपाला अधिकाधिक सामोरे जात सादर होत असतो. त्यासाठी काय करता येईल? याचा आढावा घेणारा हा शेतकरीपुत्र- श्री कृष्णकुमार गोविंदा-लक्ष्मी निकोडे गुरूजींचा लेख...
संपादक.

गेल्या काही दिवसांपासून- संपूर्ण नोव्हेंबर-२०२३ महिनाभरापासून महाराष्ट्राच्या काही भागात वादळी पावसाचा शेतीला जोरदार तडाखा बसला. तो धोका आजही कायमच पाठलाग करीत आहे. अशाप्रकारे जेव्हा शेतातील उभे पीक नष्ट होते, तेव्हा निसर्गावर अवलंबून असणारा शेतकरी एकाएकी हवालदिल होतो. परंतु, विकासाच्या अनेक कल्पना अमलात आणल्यानंतर व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करूनही शेतकर्यांना निसर्गापासून वाचण्याचा मार्ग अजून सापडत नाही, ही शोकांतिकाच म्हणावी लागेल. सरकारच्या कृषी क्षेत्रातील नीतीचा हा मोठा पराभव मानावा लागेल. म्हणून या निसर्ग आक्रमणाचा व त्यामुळे शेतकर्यांच्या होणार्या नुकसानीवर गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. नुसते नक्राश्रू दाखवून वेळ मारून नेणे कदापि योग्य नव्हे!

बदलता निसर्ग: तसा मानवाला निसर्गबदल नवीन नाही. या बदलांना सामोरे जातच मानवाने प्रगती केली. भारत हा भौगोलिकदृष्ट्या मोठा देश असल्याने कुठे अधिक पाऊस, तर कुठे दुष्काळ, असे चित्र नेहमीच असते. आपला महाराष्ट्रही त्याला अपवाद नाहीच. कोकणात जास्त पाऊस, तर विदर्भ, मराठवाडा कोरडा ठाक असतो. निसर्ग बदलाने महाराष्ट्रातील एकंदरीत पावसाच्या प्रमाणात अजून तरी फारसा बदल झाला नसला, तरी पर्जन्यचक्र मात्र बदलले आहे, हे स्पष्ट होते. विशिष्ट वेळी पाऊस पडण्याऐवजी तो केव्हाही आणि कसाही पडणे, हा या चक्रातील महत्त्वाचा बदल. यात एक-दोन दिवसांत एकदम खूप पाऊस पडणे व पुन्हा खूप दिवस पाऊस न पडणे, हेदेखील पिकासाठी उपयोगाचे नसते. मार्चमध्ये असा वादळी पाऊस आता नेहमीच होत आहे. हा पाऊस प्रदेशभर सारखा होत नाही व त्याचा परिणामही प्रत्येक क्षेत्रात व प्रत्येक शेतकर्यासाठी वेगवेगळा असतो, हे ध्यानात घेतले पाहिजे.

निसर्ग बदलास शेतकरी सदैव सज्ज राहणे गरजेचे: निसर्ग बदलत आहे व पाऊस, वारे अनियमित होत आहेत, अशा वेळी शेतकर्यांना अशा बदलासाठी तयार करणे महत्त्वाचे आहे. भारतीय शेती अल्प भूधारकांची आहे आणि येत्या काळात यात काही बदल होण्याची शक्यता नाही आणि हाच भूधारक निसर्गाच्या कोपाला जास्त-जास्त सामोरे जात असतो. यात भर म्हणजे आता स्त्रियाही शेती करू लागल्या आहेत. योजना आखताना याचा विचार होणे तेवढेच गरजेचे आहे. या बदलाच्या तयारीत कमी वेळात पीक घेणे, पिकांचा गरजेनुसार विमा घेणे, जोडउद्योग करणे व सरकारची तात्कालिक मदत मिळण्याची सरकारी व्यवस्था जवळ व कायमस्वरूपाची असणे गरजेचे असेल.

बदलता शेतकरी व बदलती शेती: शेतकरीही आता अगदी पूर्वीसारखा राहिला नाही हेही खरेच. बदललेल्या जीवन पद्धतीने उत्पन्न वाढवण्याची गरज, विकासाच्या नवीन कल्पना, बाजार सुधारणा व नवीन बी-बियाणाची उपलब्धता व पाण्याच्या-विजेच्या सोईसुविधांमुळे शेतकरी नवीन प्रयोग करतो आहे व नवनवीन पिकेही घेतो आहे. त्यासाठी तो खर्चही करतो. त्यामुळे आजची शेती ही केवळ उदरनिर्वाहाची शेती राहिलेली नसून, व्यापारी शेती होत चालली आहे. अशी शेती खर्चिक असते व कुठल्याही कारणाने झालेले नुकसान शेतकर्याला भारी पडते. आता शेतकरी साधारण पिकांबरोबर कापूस, सोयाबीन, मका, ऊस, भाजीपाला घेत आहे व फळझाडांची लागवडसुद्धा करत आहे. अवकाळी पावसाने होत असलेले नुकसान म्हणूनच जास्त होत जाते.

अपुरी मदत; अपुरे उपाय: भारतात शेतकर्यांवर आलेली नैसर्गिक आपत्ती ही एक आपत्ती मानली जाते व त्याकडे आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून पाहिले जाते. या व्यवस्थापनात आपत्ती झाल्यानंतर ती कुठे झाली? कशी झाली? त्यात कुणाचे किती नुकसान झाले वगैरे चौकशींवर भर दिला जातो. यात नुकसान आकलन होऊन मदतीसाठी पावले उचलण्याची भाषा असते व तशी मदत करण्याकडे कल असतो. त्यामुळे नुकसान झाल्याशिवाय कुणी लक्ष देत नाही. नाही म्हणायला सरकारची तात्कालिक मदत व थोडीबहुत विमा योजना कामाला येतात. पण, शेतकरी निश्चिंत होईल, अशा योजना अजून नाहीत. महाराष्ट्रात गेल्या वर्षी जून ते ऑक्टोबर २०२० या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे शेतपिकांचे व फळपिकांचे जे नुकसान झाले, त्या आपद्ग्रस्त शेतकर्यांना कमाल दोन हेक्टर क्षेत्रातील शेतपिकांसाठी रु. दहा हजार प्रतिहेक्टर व फळपिकांसाठी रु.२५ हजार प्रतिहेक्टर या दराने नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली होती. या उपायाबरोबरच शेतकर्ज माफ करणे व शेतीसाठी पुन्हा कर्ज मिळवून देणे, असे उपाय केले जातात. व्याजातही सवलती दिल्या जातात. मात्र, याने हा प्रश्न सुटत नाही हे मान्य करावेच लागेल.

पीक विमा योजना: भारतात पीक विमा योजनेने हा प्रश्न सोडवायचा प्रयत्न झाला. परंतु, त्यात पूर्णपणे यश आले आहे, असे म्हणता येणार नाही. भारतात पीक योजनेचे प्रयोग १९७२-७३ पासून सुरू झाले होते. पण, याला पूर्ण पीक विमा योजनेचे रूप १९८५ मध्ये प्राप्त झाले. त्यालाही आता ३५ वर्षे झाली आहेत. पण, अजूनही समाधानकारक अशी पीक विमा योजना अमलात येऊ शकली नाही. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, जीवन विम्यासारखी ही नफा मिळवून देणारी योजना नाही. त्यामुळे खासगी कंपन्या यात उतरत नाहीत. उतरल्या तरी त्यांना सरकारकडून नुकसानभरपाईची अपेक्षा असते. अगोदरच्या सर्व पीक विमा योजना मुख्यत: बँक कर्ज घेणार्या शेतकर्यांसाठी अनिवार्य होत्या व बाकीच्यांसाठी पर्यायी. सध्याची प्रधानमंत्री पीक विमा योजना थोडीशी पुढे जाते. ही योजना सर्व शेतकर्यांसाठी पर्यायी आहे व थोडीशी सुधारलेली आहे. राज्य सरकार वाटल्यास काही आगाऊ रिस्क- जोखीम या विमा योजनेत सामावून घेऊ शकते. यातही फार प्रगती झाली आहे, असे दिसत नाही. कॅगच्या सन २०१७च्या एका अहवालानुसार शेतकरी या पीक विमा योजनेत फारसे सामील होत नव्हते. ही संख्या २०-२२ टक्क्यांपेक्षा वाढली नाही. योजनेतील लाभार्थींचा डाटा बरोबर ठेवला जात नव्हता, योजनेची माहिती देण्यापासून ते क्लेम रक्कम शेतकर्यांना मिळेपर्यंत सर्वच बाबीत उशीर होत होता व या योजनांवरची देखरेखही कमकुवत होती. एकंदरीतच पीक विमा योजना शेतकर्यांना फारशा काही उपयुक्त ठरल्या नाहीत, हेच सत्य!

कायमस्वरूपी मदत व्यवस्था व फंड निकडीचे: सध्या शेतपिकांचे नुकसान एकट्या शेतकर्याचे नुकसान समजण्यात येते व त्याला एक तर वार्यावर सोडले जाते किंवा सरकारतर्फे काही तुटपुंजी मदत दिली जाते. पीक विमा घेतला असेल तरी तो सरळ मिळत नाही. त्यामुळे यासाठी कायम व्यवस्था असणे गरजेचे म्हणावे लागेल. शेतीक्षेत्रात काम करणार्या विशेषत: शेतकर्यांना अधिक उत्पादनासाठी प्रवृत्त करणार्या सर्व घटकांना शेतकर्यांच्या या नुकसानीत भागीदार समजण्याची गरज आहे. बी-बियाणे, खत, कीटकनाशक कंपन्या, अन्नधान्य प्रक्रिया करणार्या कंपन्या व त्यात सहभागी होणारे व्यापारी इत्यादी सर्वच शेतकर्यांना शेती आधुनिक करण्यासाठी व जास्त उत्पादन घेण्यासाठी बळी पाडत असतात. फायद्यात सगळे सामील असतात. परंतु, नुकसान एकट्या शेतकर्याचे होते. हे बदलणे गरजेचे आहे. हे सर्वच नुकसानीला जबाबदार आहेत व सर्वांनीच नुकसानीत शेतकर्याची साथ दिली पाहिजे. केवळ पीक विम्याने व सरकारच्या तुटपुंज्या मदतीने हा प्रश्न सुटणार नाही. यासाठी राज्य सरकारने या सर्वांच्या भागीदारीने एक वेगळा दीर्घकालीन फंड निर्माण केला व त्यातून शेतकर्यांचे नुकसान सढळपणे भरून काढले तर ते उपयोगी ठरू शकते. तुटपुंज्या मदतीने किंवा सांत्वनाने हा प्रश्न सुटणार नाही. यासाठी राज्य सरकारने या सर्वांच्या भागीदारीने एक वेगळा दीर्घकालीन फंड निर्माण केला व त्यातून शेतकर्यांचे नुकसान सढळपणे भरून काढले तर ते उपयोगी ठरू शकते.

शेतकरी हवालदिल आणि असहाय्य न रहावा: राज्य सरकार आपत्तीनंतर मदत जाहीर करत असले, तरी या प्रक्रियेत शेतकरी शासनाधीन व असाहाय्य असतो. क्वचित भ्रष्टाचारालाही बळी पडतो. हे थांबण्यासाठी पीक विमा विस्तारित व सरळ करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सरकारची मदत व्यवस्था कायमस्वरूपी कार्यरत असणे व मदतीचे निकष स्पष्ट व पारदर्शक असणे गरजेचे आहे. यात कुठे एकट्या शेतकर्याचे नुकसान झाले असेल तरी ते भरून देण्याची व्यवस्था असली पाहिजे. बदलत्या निसर्गचक्राला थांबवणे कदाचित अवघड आहे. मात्र, शासनामार्फत शेतकर्यांच्या मदतीची व्यवस्था करणे शक्य आहे व ती केली पाहिजे, असे तज्ज्ञांसह अनेकांना वाटते. म्हणून सांगावेसे वाटले, बा सरकारा, तुझे सहानुभूतीपूर्वक लक्ष माझ्या प्राणप्रिय अन्नदात्याकडे सदोदित राहू दे रेऽऽऽ...!

**********************

– एक शेतकरीपुत्र –
श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.
द्वारा- श्रीगुरुदेव प्रार्थना मंदिराजवळ,
रामनगर वॉर्ड क्र.२०,
गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

# श्रम विकणारे इमान विकायला का लागतात?.

देशात अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गप्पा खूप मारल्या जातात.परंतु तसे आचरण केले जात नाही.कष्टकरी मजूर कामगार,शेतकरी, शेतमजूर यांना तर कसलेही अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाही. त्यांचे संयुक्तिकपणे शोषण करणारी समाज व्यवस्था सर्वच ठिकाणी दिसते.भारत हा कधीकाळी कृषिप्रधान देश होता.समाजात जाती व्यवस्था होती.आणि जातीने आखून दिलेल्या कामानुसार लोक काम करीत होते,त्यात स्पर्धा नव्हती,मजूर पण कुशल कारागीर होता.त्याला गुलामा सारखे वागणूक दिली जात होती.महात्मा ज्योतिबा फुलेंनी १८८४ ब्रिटिशांच्या कडे मागणी केली होती सर्वांना मोफत प्राथमिक शिक्षण आणि आरोग्य मिळाले पाहिजे.खूप संघर्ष करून ते भारतातील लोकांना मिळत होते.आता प्राथमिक शिक्षण देणाऱ्या जिल्हा परिषद शाळा बंद करण्यात आल्या त्याच बरोबर प्रत्येक तालुक्यात जिल्हात असलेले सरकारी दवाखाने आरोग्य केंद्र सुद्धा बंद करण्यात आले.त्यामुळे असंघटीत कष्टकरी समाजाच्या मुलांना लाचार कंत्राटी कामगार गुलाम बनविल्या जात आहे. म्हणूनच श्रम विकणारे कष्टकरी कामगार मतदार बनून मजबूर होऊन इमान विकायला लागले.

आज ही देशात ९३ टक्के समाज हा असंघटित कामगार मजूर म्हणूनच गणल्या जातो. त्यांच्या अधिकृतपणे नोंदणी होऊन संघटना स्थापन होतात,पण त्या समाज व्यवस्थे समोर टिकाव धरू शकत नाही.उलट ७ टक्के संघटित कामगार,कर्मचाऱ्यांच्या ५५ हजार नोंदणीकृत संघटना आहेत,त्यांचे समाज व्यवस्थेवर आणि शासन यंत्रणेवर भक्कमपणे पकड आहे.त्यांच्या कोणत्याही सुख सुविधेच्या विरोधात समाज व शासन कारवाई करण्यास असमर्थ आहे.त्यांना त्यांच्या मुलामुलींना मिळणाऱ्या शिक्षण,आरोग्य लहान पणापासूनच्या सुख सुविधांचा विचार केल्यास प्रचंड तफावत स्पष्टपणे दिसून येते.

असंघटित कामगारांच्या मुलामुलींना आज बालवाडी पासूनच फुकटचा भात,अंडी,शिरा देऊन बालमनापासूनच लाचारीची सुरुवात होते व पुढे तरूणपणी दहा रुपयांत जेवण,१०० यूनिट्स मोफत वीज,फुकट रेशन सरसकट,आवास योजनेंतर्गत निरर्थक सूट,ऊठसूठ कर्जमाफी ह्या गोष्टींची आशा लावून सध्याच्या आणि पूर्वीच्याही सरकारने आणू घातलेल्या या योजना समाजाच्या मानसिकतेवर अतिशय घातक परिणाम करून जाणाऱ्या आहेत.त्यांचा खरा लाभार्थी शासकीय अधिकारी,कर्मचारी आणि राजकीय पक्षाचा कार्यकर्ता पदाधिकारी जास्त असतो. त्यामुळेच संघटित कामगार असंघटित अधिक असंघटित लाचार श्रम विकणारा आणि इमान विकणारा मोठा मतदार आहे तो कायमस्वरूपी लाचार गुलाम राहावा अशीच मनुवादी समाज व्यवस्था देशात राबविण्यात येत आहे.

देशात सध्या जवळपास ६७ टक्के लोकसंख्या तरुणांची आहे ती सुशिक्षित बेरोजगार म्हणूनच गणली जाते,ती कोणत्याही राज्यात राजकीय पक्षाची मोठी आधार शक्ती आहे,तिची अवस्था घरका नां घाटका अशी आहे.ज्या वयात आपले भविष्य घडवण्यासाठी कष्ट करायला हवेत त्या वयातल्या तरुणाला महिना ६०० रुपये दिले की जेवण,मोफत वीज,सरसकट कर्जमाफी दिली जाते. त्यामुळेच त्यांची विधायक क्रयशक्ती संपून जाणारी आहे.त्यांचा कोणत्याही विचारधारेच्या राजकीय पक्षावर विश्वास राहिला नाही. सर्वच चोर आहेत अशी त्यांची भावना झाली आहे.गेल्या वीस पंचवीस वर्षात तशीच शिक्षण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे,त्यातून लाचार गुलामच निर्माण होतील अशी नियोजन बद्ध योजना राबविण्यात येत आहे.यामध्ये अजून एक भयंकर गोष्ट म्हणजे असे की गेल्या १० वर्षापासून इ. १ ली ते ८ वी पर्यंत परिक्षाच घेतली जात नाही.झाली तरी त्यात कोणीच नापास केल्या जात नाही.९ वी साठी ही वर्गोन्नतीचे अलिखीत आदेश आहेत. त्यामुळे यापुढे तरूणपिढीचा भविष्यकाळ खूप कठिण असणार आहे.तो सुशिक्षित असूनही त्याला लिहता वाचता येणार नाही. त्यामुळेच तो राजकीय पक्षाच्या नेत्याचा विश्वासू कार्यकर्ता असणार आहे, त्याची योग्य खाण्यापिण्याची व्यवस्था झाली की तो हजारो असंघटित कामगार सुशिक्षित बेरोजगार आपल्या इशाऱ्यावर नाचवणारा भक्त होत आहे.

ग्रामीण भाग असो किंवा शहरातील चौक,बहुतांश ठिकाणी तरुणाच्या हातात महागडे स्मार्ट मोबाईल,१५० सीसी च्या मोटर बाईक्स, तोंडात गुटखा,सिगारेट रुबाबदार बोलणे दादा,काका,अण्णा,भाऊ,भाई च्या भरोशावर उच्च उड्या मारून नगरात,विभागात दहशत निर्माण करतात. कोण कसा चुकतो पासून गावातल्या फ्लेक्सवर आपला फोटो कोणत्या पोजमध्ये टाकायचा यासारख्या चर्चेत गुंतलेला असतो.आता हीच तरुणाई या गोरगरिबांचे मोठ्या प्रमाणत आर्थिक शोषण करून करोडपती झाले आहेत.त्यातील फुकटचे दान वाटणाऱ्या राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या सतरंज्या उचलायला तरुण सहज उपलब्ध असल्यामुळे फुकट जेवण,फुकट वीज,थोडासा बेरोजगार भत्ता,फुकट रेशन यामुळे एक अख्खी कर्तृत्ववान पिढी बरबाद झाली आहे आणि भविष्यात अनेक युवा पिढी अपंग,लाचार गुलाम होणार आहे.त्यामुळेच देशात सर्वच क्षेत्रात कायम चालणारे काम सुद्धा कंत्राटी पद्धतीने चालणार आहे.सरकार आणि खाजगी मालक कंत्राटदार नेमणार तो कंत्राटदार कंत्राटी कामगार त्यांच्या मर्जीने ठेवेल. त्याविरोधात बोलल्यास कायम कामावरून हकालपट्टी ठरली आहे.

आजच्या तरुणाकडे एक ध्येय उदिष्ट जिद्द असायला पाहिजे,कष्ट त्याग करण्याची तयारी



असली पाहिजे.हा तरुण धेयवादी असावा तरच तो या गोष्टींना लाथ मारील व मला फुकटचे नको असे सांगेल.सगळेच फुकट अशी सवय लागली की पुढच्या सरकारकडून हीच त्यांची अपेक्षा देखील राहणार.कोणतीही वस्तू फुकट पडत नसते,यासाठी लागणारा निधी जो ग्राहकांकडूनच ५-६ टक्के कर म्हणून वसूल केल्या जातो.शेतकऱ्यांच्या प्रत्येक उत्पादनांवर महागाईच्या रुपाने वसूल केला जातो पण तो शेतकऱ्यांना दिला जात नाही. शेतकऱ्याच्या शेतीतील अन्न धन्याला एम.आर.पी नाही.पण इतर सर्व उत्पादनाला एम.आर.पी असते.त्याचा हिशेब लागत नाही.

स्विट्झरलंडमध्ये ३-४ वर्षांपूर्वी सर्व नागरिकांना सरकारने तिजोरीत शिल्लक असलेली गलेलट्ठ रक्कम दरमहा फुकट देऊ केली होती.तेव्हा ७७ टक्के लोकांनी आम्हाला फुकटचा पैसा नको,आमची क्रयशक्ती कमी होईल असे सांगून त्याला विरोध केला होता. जगातील लोकांना स्विट्झरलंडची सौंदर्य,सुबत्ता दिसते,पण त्या मागे प्रत्येक नागरिकाची जिद्द, कष्ट,कर्तव्यनिष्ठता मेहनत दिसत नाही.ते आपण सुद्धा विसरतो.भारत हा कृषिप्रधान देश होता सुज्लाम,सुप्लाम सोन्याचा धूर निघणारा देश म्हणून ओळखला जात होता.

आपल्याला जर खरच स्वतःला आणि भारत देशाला संपन्न करून प्रगति पथावर न्यायचे असेल तर सगळेच फुकट देण्याची घेण्याची मानसिकता सोडावी लागेल.आणि धर्माची अफू देणाऱ्या व्यवस्थेला दूर करण्याचा निश्चय प्रत्येकाने केला पाहिजे.सरकारनेही जीवनावश्यक वस्तू रास्त भावात द्यायलाच हव्यात.प्रत्येक हाताला काम आणि श्रमाला योग्य दाम दिल्यास मोफत घेण्याची देण्याची गरज पडणार नाही.अन्न फुकट का पाहीजे?. ते खाण्यासाठी पैसे नाहीत म्हणूनच ना?. ते सरकार का देते?.भूकबळी जाऊ नये म्हणूनच ना ?. श्रम विकणारे इमान विकायला का लागतात?.त्यांना मजबूर कोण करतो.धर्माच्या नांवाने होणारे शोषण कोणालाच दिसत नाही.राजकीय वर्चस्वासाठी जात दांडगे,धनदांडगे याचं असंघटीत कष्टकरी कामगारांना लाचार गुलाम बनवून ठेवतात. असंघटीत कामगारांच्या मुलामुलींनी शिक्षणात प्रगती करून आर्थिक प्रगती केली तर त्याला ही शेवटी मानसिक दुष्ट्या लाचार गुलाम बनविल्या जाते. तोच मग मागासवर्गीय जातीच्या सेलचा राजकीय पक्षाचा अध्यक्ष बनविला जातो.मग पुनःपुन्हा श्रम विकणारे इमान विकायला लागतात.असंघटीत समाजातील कामगार मजुरांनी संघटीत झाले पाहिजे. संत,महापुरुषांचा इतिहास वाचून प्रेरणा घेतली पाहिजे.आणि त्यानुसार आचरण केल्यास श्रम विकणारे इमान विकायचे थांबतील.त्यामुळे मग शैक्षणिक,सामाजिक,सांस्कृतिक,धार्मिक आणि राजकीय परिवर्तन झाल्या शिवाय राहणार नाही.जगातील ज्या काही क्रांत्या झाल्या त्या कामगारांनी केल्या असा इतिहास आहे.त्यासाठी असंघटीत कामगारांनी इतिहास वाचला तर इतिहास घडविता येईल.

सागर रामभाऊ तायडे
९९२०४०३८५९,भांडूप,मुंबई.

# ईव्हीएम छेडछाड लोकशाहीची हत्या

ईव्हीएम इलेक्ट्रॉनिक व टेक्निकल डिव्हाईस असल्यामुळे इव्हिएम मध्ये घोटाळा होऊ शकतो असे अनेक तंत्रज्ञ लोकांचे मत आहे. अनेकांनी ईव्हीएम मध्ये मताची हेराफेरी कशी केली जाऊ शकते याचे सर्वांसमोर प्रात्यक्षिक सुद्धा दिलेले आहे. इव्हिएमद्वारे मोजणी केलेले मतसंख्या व प्रत्यक्षात झालेल्या मतसंख्येत अनेक ठिकाणी अनेक वेळा खुप मोठी तफावत सुद्धां आढळून आलेली आहे. अनेक बुथवर बटण कोणाचेही दाबा मत मात्र कमळालाच जाते असे सुद्धां दिसुन आलेले आहे. अगोदरच्या व सध्या सुरू असलेल्या निवडणूकीमध्येही खाजगी वाहणात ईव्हीएम आढळून आल्याचे समोर आले आहे. बर हे खाजगी वाहण कमळाशीच संबधीत आहेत. जेथे मताची तफावत आहे तेथे कमळाचाच उमेदवार विजयी आहे. म्हणजेच काय तर ईव्हीएम मध्ये बिघाड असो, बाहेर इव्हिएमचा घोटाळा असो, वा मतमोजणी मध्ये झालेली हेराफेरी असो. हे सर्व कमळासोबतच का घडते हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ईव्हीएम खाजगी वाहणामध्ये सापडणे, मतमोजणी मध्ये तफावत असणे, कोणतेही बटण दाबले तर मत कमळाला जाणे ही साधी गोष्ट नाही. कारण वरील कृत्य लोकांचा मताधिकार शुन्य करून लोकशाहीची हत्या करणारे आहे. इलेक्ट्रॉनिक स्ट्रीम मिडिया हा जनतेचा मिडिया न राहता कमळाचा मिडिया झाल्याने या गंभीर बाबी जनतेपासून जाणीव पुर्वक लपवल्या जात आहेत. लोकशाही मध्ये सत्ता बदल करण्यासाठी सर्वात मोठे शस्त्र जर कोणते असेल ते आहे मताधिकार. परंतु याच मताधिकाराला शुन्य करून लोकशाहीची हत्या केली जात असेल तर देशात लोकशाही आहे असे म्हणणे निव्वळ अज्ञान पणाचे ठरेल. कारण ईव्हीएम च्या माध्यमातून तयार झालेल्या सरकार ला लोकांच्या मताची गरज राहली नाही. औपचारिक पणे निवडणूक घेऊन इव्हिएम मध्ये गडबड करून हवा तो उमेदवार निवडून आणला जात असेल तर लोकांच्या मताला काय किंमत? आणि लोकांच्या समस्या कशा सुटणार? लोकशाहीची हत्या करून सत्तेत बसलेले लोक लोकांच्या हिताची कामे कधीच करू शकत नाहीत. म्हणून आज शिक्षणाचा व्यापार, बेरोजगारी, महागाई, आरोग्य सुविधेचा अभाव, शेतमालाला भाव नसते, बेरोजगार लोकांना एकमेकांना विरोधात लढवून जातीय व धार्मिक तेढ निर्माण करून तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्या सारखे प्रकार जास्त वाढत आहेत. इव्हिएमच्या माध्यमातून व जनतेच्या मतामध्ये हेराफेरी करून तयार झालेल्या सरकारला वैध्य सरकार नेमके कोणत्या आधारावर म्हणता येईल. आताच पाच राज्यात विधानसभा मतदारसंघात निवडणुका झाल्या. नेहमी प्रमाणे इव्हिएम गडबडी व संशयास्पद ईव्हीएम येथेही आढळून आल्या. मध्य प्रदेश मध्ये तर ज्या स्ट्रॉंगरुम मध्ये ईव्हीएम ठेवण्यात आल्या त्या स्ट्रॉंगरुमलाच सर्वसामान्य लोकांनी पहारा देऊन इव्हिएमची सुरक्षा करत आहेत. परंतु त्यामध्येही अचानक स्ट्रॉंगरुम ला लावण्यात आलेल्या सिसिटीव्ही कॅमेऱ्याचे सिग्नल जातात आणि स्ट्रॉंगरुम मधले एका तासासाठी सर्वच दिसणे बंद होते. सर्व सिसिटीव्ही एकाच वेळी बंद होऊ शकतात तर इव्हिएम मध्ये छेडछाड का होऊ शकत नाही? जे काम निवडणूक आयोगाने करायला पाहिजे ते काम अर्थात पारदर्शक निवडणूक घेण्याचे व त्यांला संरक्षण देण्याचे तेच काम सर्व सामान्य लोकांना करावे लागत असेल तर निवडणूक आयोग नेमके कोणते काम करतो हा प्रश्न उपस्थित राहणे साहजिकच आहे. निवडणूक आयोगाच्या कस्टडीत असलेल्या ईव्हीएम कमळाच्या गाडीत कशा सापडतात? कमळावाले आणि निवडणूक आयोग एकच आहेत का हा प्रश्न सर्वसामान्य जनतेच्या मनात घर करून बसला आहे. निवडणूक आयोगाकडच्या ईव्हीएम कमळाकडे, बटण दाबले तरी मत कमळाकडे, मतमोजणी तफावत मत कमळाकडे हा जाहीर घोटाळा निवडणूक आयोगाच्या लक्षात येत नाही का? सर्व सामान्य लोक व अनेक राजकीय पक्ष यांनी इव्हिएम बंद करून बँलेट पेपरवर निवडणूक घेण्याची मागणी केली असताना लोकांचा ईव्हीएम वर विश्वास नसताना निवडणूक आयोग ईव्हिएमवरच निवडणूक घेऊन लोकशाही ची हत्या कोणाच्या सांगण्यावरून करत आहे नव्याने सांगण्याची गरज नाही. थोडक्यात लोकशाहीला बाजूला सारून निवडणूक आयोग व कमळ एकत्र येऊन काम करताना कमळाचा मिडिया एकही शब्द बोलत नाही यावरून कमळाप्रती किती एकनिष्ठ आहे याची जाणीव होते. एका ठिकाणी बँलेट पेपरची पेटी रात्री उघडल्याचे समोर आले आहे. मतमोजणी अगोदरच बँलेट पेटी उघडून मताची हेराफेरी करून बहुतेक कमळावाले अंधाऱ्या रात्रीत लोकशाही मजबूत करण्याचा प्रयत्न करत असतील. लोकशाहीची हत्या होताना, लोकांच्या मताची किंमत शुन्य होताना स्ट्रीम मिडिया तर काही बोलत नाही परंतु स्वतः ला राष्ट्रप्रेमी समजणारे, स्वतः ला विद्वान व गुणवंत समजणारे लोकही जर इव्हिएमच्या विरोधात बोलणार नाही आणि पारदर्शक निवडणुकीची मागणी लाऊन धरणार नाहीत तर येण्याऱ्या पिढी आर्थिक, शारीरिक व मानसिक गुलाम झाल्याशिवाय राहणार नाही. जनतेचा हजारो करोडो रुपये खर्च करून इव्हिएम ला व्हिव्हिपँट बसवले आहे. कारण सुरवाती पासून लोकांचा विश्वास इव्हिएमवर बसत नव्हता. म्हणून व्हिव्हिपँट बसवले. व्हिव्हिपँट द्वारे आपण दिलेले मत आपल्याच उमेदवाराला गेले का याची खात्री करता येते. मग जर मतदार हा व्हिव्हिपँट मधील स्लिप ला बघुन आपल्या मताची खात्री करून घेऊ शकतो तर ज्या आधारावर खात्री केली जाते ते व्हिव्हिपँट स्लिप ची मोजणी का होत नाही? हा सर्वात मोठा प्रश्न आहे. इव्हिएम पारदर्शक आहे, कमळाचा त्यामध्ये काहीच हस्तक्षेप नाही तर व्हिव्हिपँट मधील स्लिपची मोजणी झाली तर बँलेट पेपर ही लावण्याची गरज नाही. परंतु इव्हिएम, इव्हिएमच्या माध्यमातून होणारी मताची हेराफेरी या विरोधात बहुतांश नागरिक व विरोधी पक्ष कधी कधी बोलताना दिसतात. परंतु कमळावाले मात्र कधीच इव्हिएमच्या विरोधात बोलत नाहीत. बर इव्हिएम मध्ये गडबड होऊ शकते म्हणून सर्वात अगोदर इव्हिएमला कायदेशीर विरोध करणारे कमळावालेच होते. परंतु कमळाच्या हाती सत्ता आल्याने इव्हिएम पण शुद्ध झाली असेच दिसते. जसे कमळाकडे भ्रष्टाचारी आमदार खासदार गेले की ते प्रामाणिक होतात तीच गत इव्हिएमची झाली आहे. कमळावाल्यांना आपल्या कामावर विश्वास असेल, आणि जनतेच्या मताची किंमत असेल तर एकदा तरी त्यांनी बोलाव लोक म्हणतील तशी निवडणूक घ्या. आम्ही आमच्या कामावर निवडून येऊ. परंतु एवढे धाडस कमळावाले करतील ही अपेक्षा च जनतेने सोडून दिली आहे. कमळावाले इव्हिएम ला एवढा जिव लावत आहेत की जसे इव्हिएम त्यांच्या पक्षातील एक महत्त्वाचा घटक आहे. लोकमत कमळाच्या विरोधात दिसत असताना कमळाचे अस्तित्व केवळ ईव्हिएम वर अवलंबून आहे. इव्हिएम बंद केली किंवा व्हिव्हिपँट च्या स्लिपची जरी मोजणी तर कमळ व्हेंटिलेटरवर असेल असा लोकांचा समज आहे. परंतु कमळाला वाचवण्यासाठी इव्हिएमच्या माध्यमातून लोकशाही ची हत्या होत असताना आपण आपल्या डोळ्यांनी पाहत असु आणि लोकशाही ची हत्या होण्याचे दु:ख होत नसेल, चिड येत नसेल तर एक गोष्ट नक्की आपण तर गुलाम झाले आहोत. येणारी पिढीही गुलामच होईल. प्रत्येक निवडणुकीत इव्हिएमचा गैरवापर दिसून येतो, लोकांचा विश्वास इव्हिएमवर नाही, इव्हिएम जनतेचे मत नष्ट करून भलतेच कोणाला मत देत असेल तर हि खुप गंभीर गोष्ट तर आहेच परंतु लोकशाहीची हत्या ही आहे. लोकशाही वाचवण्यासाठी व गुलामी नष्ट करण्यासाठी इव्हिएम बंद करून बँलेटपेपरवर निवडणूक घेऊन लोकांना त्यांच्या मताधिकाराचा योग्य वापर करून स्वतः चे भविष्य व देशाचा विकास स्वतः घडवता आला पाहिजे. म्हणून लोकशाही ला वाचवण्यासाठी सर्वांनी एकत्र ईव्हिएम ला विरोध करून पेपरवर निवडणूक होणे आवश्यक आहे.

************

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# दक्षिण भारतातले काश्मिर, बर्फात खेळण्याचा आनंद घ्यायचाय तर इथं गेलंच पाहिजे

हिवाळ्यात फिरण्याची खरी मजा लुटण्यासाठी लोक काश्मिरला जाण्याचे प्लॅनिंग करतात. काश्मिर पट्ट्यात गेलं की डलहौसी, मनाली, कुलू आणि शिमला इथेही पर्यटकांची गर्दी होते. नवं लग्न झालेले कपल्स हनीमूनसाठी काश्मिरलाच पसंती देतात. उबदार कपडे घालून बर्फाच्छादीत रस्त्यांवर जोडीदाराचा हात पकडून सोबत टाकलेली ती पावले नेहमी लक्षात राहतात.

सर्वांना काश्मिरला जाणं परवडत नाही. अशा लोकांना दक्षिण भारतातही बर्फवृष्टीचा आनंद घेता येईल? बर्याच वेळा, फ्रेश बर्फवृष्टीचा आनंद घेण्यासाठी दुर्गम दक्षिण भारतातील शहरातून उत्तर भारतात जाणे शक्य नसते. पण दक्षिण भारतातही तुम्ही फ्रेश हिमवर्षावाचा आनंद घेऊ शकता.आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम जिल्ह्यात वसलेले लांबसिंगी गाव आहे. ज्याला दक्षिणेचे काश्मीर म्हटले जाते. हे गाव समुद्रसपाटीपासून सुमारे १०२४ मीटर उंचीवर वसलेले आहे. उंचीमुळे या गावात हिवाळ्यात तापमान शून्याच्या खाली पोहोचते. या कारणास्तव या गावाला दक्षिणेचे 'काश्मीर' म्हटले जाते.येथील तापमान सामान्यतः कमाल ३२ओ सेल्सिअस ते किमान ६ओ पर्यंत असते. काहीवेळा ते ०ओ सेल्सिअसच्या खालीही जाते. हिवाळा ऐन भरात असताना उत्तर भारतात थंडीच्या लाटेच्या बातम्या सर्रास येतात.सूर्यच उगवत नाही यावेळी अनेक दिवस सूर्य उगवत नाही. तसेच लांबसिंगी गावातही हिवाळ्यात अनेक दिवस सूर्य उगवत नाही. ज्या दिवशी सूर्यदर्शन होतो त्या दिवशी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंतच येथे सूर्य दिसतो, त्यामुळे स्थानिक आदिवासी समाजातील लोकांना त्यांच्या दैनंदिन कामात खूप अडचणी येतात.पार्क स्ट्रीट ते सेंट पॉल कॅथेड्रल चर्च



ख्रिसमसच्या दिवशी कोलकातामधील ही ठिकाणे एक्सप्लोर करा. यामुळेच या गावाला कोरा ब्यालू असेही म्हणतात. स्थानिक भाषेत कोर्रा म्हणजे काठी आणि बायलू म्हणजे घराबाहेर. म्हणजेच हिवाळ्यात कोणी घराबाहेर राहिल्यास तो काडीसारखा कडक होईल.लांबसिंगीला भेट देण्याची उत्तम वेळ लांबसिंगी गावाला भेट देण्याचा सर्वोत्तम काळ म्हणजे डिसेंबर आणि जानेवारी. यावेळी, हिवाळा तीव्र असतो आणि येथे तापमान शून्याच्या जवळ पोहोचते. येथे दरवर्षी बर्फवृष्टी होत नसली तरी जेव्हाही ती येते तेव्हा ती डिसेंबर ते जानेवारी दरम्यानच होते.हिमवर्षाव व्यतिरिक्त, तुम्ही येथे धुके असलेले पर्वत, हिरवळ आणि शांत वातावरणाचा नक्कीच आनंद घ्याल. लांबसिंगीला येणारे पर्यटक इथून कॉफी आणि काळी मिरी नक्कीच विकत घेतात, जी इथे मोठ्या प्रमाणावर पिकवली जातात. अलिकडच्या वर्षांत, सफरचंद देखील मोठ्या प्रमाणात घेतले जातात. इको टुरिझम विकसित होत आहे गेल्या काही वर्षात या गावाला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढली आहे. त्यामुळे येथे छोटी हॉटेल्स बांधली जात आहेत. याशिवाय आंध्र प्रदेश पर्यटन विकास महामंडळ (-झढऊ) ने येथे रिसॉर्ट्स देखील बांधले आहेत, जिथे पर्यटकांना खूप चांगले पॅकेज उपलब्ध करून दिले जाते.विशाखापट्टणम किंवा आसपासच्या शहरांमध्ये येणारे पर्यटक काही काळ राहण्यासाठी आणि दक्षिण भारतातील या काश्मीरच्या सौंदर्याची प्रशंसा करण्यासाठी येथे येऊ लागले आहेत.लंबासिंगीला कसे पोहोचायचे लांबसिंगीला सर्वात जवळचे विमानतळ विशाखापट्टणम आहे, जे सुमारे १०७ किमी अंतरावर आहे. विशाखापट्टणम ते लंबासिंगी पर्यंत सरकारी आणि खाजगी बस सेवा उपलब्ध आहेत जी तुम्हाला थेट लंबासिंगीला घेऊन जातील. लांबसिंगीमध्ये दरवर्षी बर्फवृष्टी होत नाही आणि इथे कधी बर्फ पडेल हे कोणालाच माहीत नाही. जर तुम्ही भाग्यवान असाल तर दक्षिण भारतातील या गावात तुम्हाला यावर्षी बर्फवृष्टीचा आनंद घेण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे.

# 'स्वास्थ्यम'मध्ये वाचक-लेखक संवादमंच

'सकाळ प्रस्तुत सुहाना स्वास्थ्यम' या महोत्सवात तज्ज्ञ लेखकांकडून शारीरिक, मानसिक आणि आत्मिक उन्नतीचे गमक जाणून घेण्याची अनोखी संधी वाचकांना मिळणार आहे. त्यासाठी या महोत्सवात 'वाचक-लेखक संवादमंच' असा उपक्रम होणार आहे. तसेच, स्वास्थ्यासाठी उपयुक्त व मार्गदर्शक ठरणाऱ्या पुस्तकांचे भव्य दालन 'क्रॉसवर्ड'तर्फे साकारण्यात येणार आहे.महोत्सवात 'सकाळ प्रकाशना'तर्फे स्वास्थ्यासाठी आणि आत्मिक उन्नतीसाठी उपयुक्त ठरणारी सहा पुस्तके प्रकाशित करण्यात येतील. या पुस्तकांच्या तज्ज्ञ लेखकांशी 'वाचक-लेखक संवादमंचा'च्या माध्यमातून संवाद साधता येईल. या लेखकांमध्ये मानसशास्त्रज्ञ आणि लेखिका डॉ. प्रतिभा देशपांडे, योगतज्ज्ञ देवयानी एम., रेडिओलॉजिस्ट श्वेता भारती, लेखिका डॉ. सीमा सोनीस आणि रिटा दाते यांचा समावेश आहे.'क्रॉसवर्ड'च्या भव्य पुस्तक दालनात ३००हून अधिक स्वास्थ्यविषयक जगभरात गाजलेले लेखक आणि वाखाणलेली पुस्तके उपलब्ध होणार आहेत. अध्यात्म व योगगुरू श्री एम, श्री गुरू बालाजी तांबे, आचार्य रजनीश (ओशो), सद्गुरू, पौराणिक लेखक अक्षत गुप्ता, सेलिब्रेटी फिटनेस ट्रेनर यास्मीनकराचीवाला, मोटिवेशनल सिंगर व लेखक रॉबिन शर्मा यांच्या पुस्तकांसह 'इकेगाई' तसेच भगवद्गीतेविषयक अनेक पुस्तके येथे उपलब्ध होतील. या दालनात पुस्तक खरेदीचा आनंदही वाचकांना घेता येणार असून महोत्सवानिमित्त पुस्तकांवर ५० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येणार आहे.'अवेकनिंग युवर ब्लिस'च्या मुखपृष्ठाचे अनावरणआत्मस्वास्थ्य प्राप्त करण्याच्या दिशेने आपला प्रवास सुरू होण्यासाठी वैदिक आणि यौगिक परंपरेचा वारसा सांगणाऱ्या गुरुवर्यांचे आशीर्वादरूपी मार्गदर्शन उपलब्ध करून देणारे पुस्तक म्हणजे 'अवेकनिंग युवर ब्लिस!' या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे अनावरण 'स्वास्थ्यम'मध्ये महोत्सवात करण्यात येणार आहे. हे पुस्तक आठ मार्च २०२४ ला प्रकाशित होणार असून, मुखपृष्ठाच्या अनावरणानंतर पुस्तकाच्या प्रकाशन पूर्वनोंदणीची लिंक खुली होईल.

# सायंकाळी ६ नंतर या मंदिरात काय घडतं? कोणासही प्रवेश करण्यास आहे मनाई

एखादे प्राचिन मंदिर म्हटलं की देवांची प्रतिमा, देवांची आरती, पूजा केली जाते. दिवसातून पाच ते सहावेळा देवांची आरती, नैवेद्य सुरू असतात. पण आपल्या देशात एक मंदिर असं आहे. जिथे सायंकाळ झाली की, मंदिर बंद केलं जातं. आणि ते सकाळीच उघडतं.मधेपुरा जिल्ह्यातील आलमनगर तालुक्यातील खुरहान गावातील माता डाकिनी मंदिर परिसरात हा नियम वेगळा आहे. संध्याकाळी ६ नंतर या मंदिरात प्रवेश करण्यास मनाई आहे. पुजारी सांगतात की मंदिराचे दरवाजे सकाळी ६ वाजता उघडतात आणि संध्याकाळी ६ वाजता बंद होतात.देवी डाकिनी मंदिरात दररोज बकऱ्यांचा बळी दिला जातो, जो येथील अनोख्या पूजेचा एक भाग आहे. याशिवाय येथे जास्तीत जास्त लाडूंचा नैवेद्य दाखवला जातो, जो एक विशेष धार्मिक विधी दर्शवतो.या मंदिराची स्थापना १३४८ मध्ये झाली होती. दुर्गा माता म्हणून प्रसिद्ध असलेल्या खुर्हानची माता डाकिनी जवळपास सातशे वर्षांपासून या ठिकाणी आहे. मंदिराचे पुजारी कमलेश झा सांगतात की, आईने त्यांचे आजोबा पंडित भयो झा यांना स्वप्नात दर्शन दिले होते. त्यानंतर १३४८ मध्ये स्थानिक लोकांच्या मदतीने येथे मंदिर बांधले गेले.येथे दूर्गा मातेच्या ९




व्या रूपाची पूजा केली जाते. लोक या मातेला माता जंगलवाली, माता डाकिनी आणि माता छिन्नमस्तिका या तीन नावांनी ओळखले जाते. माता जंगलवाली हे नाव आहे, कारण इथे माता जंगलात वास करत असे, तर माँ छिन्नमस्तिकेचा अर्थ आहे की ती राक्षसांचे मस्तक कापणारी आहे.या मंदिरात मातेचा वास आहे पंडित कमलेश सांगतात की, डाकिनी मातेच्या मंदिरात सकाळी ६ ते संध्याकाळी ६ या वेळेत पूजा केली जाते. यानंतर मंदिर परिसरात लोकांना प्रवेश बंदी आहे. त्यांच्या मते या ठिकाणी संध्याकाळनंतर माता स्वत: मंदिराच्या विशाल आवारात फेरफटका मारते, अशी श्रद्धा या भक्तांची आहे.

# चेहऱ्यावर हवा आहे गुलाबी ग्लो? मग, सफरचंदापासून बनवा 'हे' फेसपॅक्स

थंडीच्या दिवसांमध्ये आरोग्यासोबतच त्वचेची देखील खास काळजी घ्यावी लागते. वातावरणातील बदलामुळे त्वचा आणि केस अधिक कोरडे होऊ लागतात. त्वचा अधिक कोरडी झाल्यामुळे त्वचेच्या इतर समस्या निर्माण होतात.हिवाळ्यात त्वचेवर रॅशेस येणे, सुरकुत्या दिसणे, त्वचा फाटणे, त्वचेला तडे जाणे, इत्यादी समस्या निर्माण होतात. या समस्या दूर करण्यासाठी आपण अनेक प्रकारच्या लोशन्स, मॉईश्चरायझर्सचा त्वचेवर वापर करतो. मात्र, त्याने तात्पुरता फरक पडतो. या समस्या दूर करण्यासाठी तुम्ही सफरचंदाची देखील मदत घेऊ शकता.सफरचंद हे आपल्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. परंतु, आरोग्यासोबत सफरचंद हे त्वचेसाठी देखील तितकेच फायदेशीर आहे. आज आपण त्वचेच्या समस्या दूर करण्यासाठी लाभदायी असलेल्या सफरचंदाच्या फेसपॅक्सबद्दल जाणून घेणार आहोत.सफरचंद आणि दही हा फेस पॅक तुमची त्वचा खोलवर स्वच्छ करण्याचे काम करेल. हा फेस पॅक तयार करण्यासाठी तुम्हाला सफरचंद, दही आणि लिंबाचा रस लागेल. आता सर्वात आधी सफरचंद मिक्सरला बारीक करून घ्या. आता या सफरचंदाच्या पेस्टमध्ये २-३ चमचे



दही मिसळा. त्यानंतर, त्यात लिंबाचा रस मिसळा. आता हे सर्व मिश्रण चांगल्या प्रकारे एकत्र करून चेहऱ्यावर लावा. १५-२० मिनिटांनी चेहरा कोमट पाण्याने धुवा.सफरचंद आणि मध मधामुळे आपल्या त्वचेवर ग्लो येण्यास मदत होते. सफरचंद आणि मधाचा हा फेसपॅक तुमच्या चेहऱ्यावर लावल्याने चेहरा उजळेल आणि पिंपल्सची समस्या दूर होण्यास मदत होईल.हा फेस पॅक बनवण्यासाठी सफरचंदाची मिक्सरला बारीक पेस्ट करून घ्या. आता, या पेस्टमध्ये १ चमचा मध आणि १ चमचा हळद मिसळा. तुम्हाला हवे असल्यास त्यात तुम्ही गुलाबजल मिसळू शकता. आता हे सर्व मिश्रण चांगल्या प्रकारे एकत्र करा आणि चेहऱ्यावर लावा. १५-२० मिनिटांनंतर चेहरा स्वच्छ पाण्याने धुवा.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात विद्यापीठ पदवी हिवाळी परीक्षा २०२३ सुरळीत सुरू



लातूर :- श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय (केंद्र क्रमांक ३०४), लातूर येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत पदवी हिवाळी परीक्षा २०२३ दि. २९ नोव्हेंबर २०२३ पासून सुरळीतपणे सुरू झाली आहे. ही परीक्षा दि. २९ नोव्हेंबर २०२३ ते १० जानेवारी २०२४ पर्यंत सुरू राहणार असून सकाळ आणि दुपार अशा दोन सत्रामध्ये बी. ए., बी. कॉम., बीएस्सी., बी. सी. ए. आणि बी. सी. एस. या शाखेतील विद्यार्थी परीक्षा देत आहे. या परीक्षेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. दिगंबर नेटके यांचे मौलिक मार्गदर्शन मिळत असून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या मार्गदर्शनाखाली ही परीक्षा सुरू आहे त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. या परीक्षेमध्ये केंद्र प्रमुख म्हणून डॉ. राजकुमार लखादिवे कार्यरत असून सहाय्यक केंद्र प्रमुख म्हणून डॉ. शितल येरुळे, प्रा. धोंडीबा भुरे, डॉ. विनायक वाघमारे आणि सहकेंद्र प्रमुख म्हणून डॉ. नवनाथ सिंगापुरे कार्य करीत असून कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, यशपाल ढोरमारे, गोपाल तिरमले, बालाजी डावकरे, योगेश मोदी, संतोष येचेवाड, राम पाटील, योगिराज माकणे, मदन कलबोने, महादेव कोरे, आनंद खोपे, शुभम बिरादार, राजाभाऊ बोडके, श्रीशैल्य पाटील, संदीप मोरे, भीमाशंकर सुगरे, अजय गायकवाड यांचे मौलिक सहकार्य मिळत आहे. या परीक्षेच्या यशस्वीतेसाठी वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू-भगिनी आणि शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहे.

# तेलंगणामध्ये काँग्रेस घडवणार चमत्कार ? केसीआर यांना एक्झिट पोल मध्ये झटका



हैद्राबाद- तेलंगणामधील सीएनएनच्या एक्झीट पोलमधून काँग्रेस सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर येत असल्याचं चित्र आहे. तर सत्ताधारी बीआरएसला राज्यात धक्का बसणार आहे. सीएनएनच्या एक्झीट पोलनुसार काँग्रेसला ५६ जागा मिळतील, तर बीआरएसला ४८ जागांवर समाधान मानावे लागणार आहे. भाजपला १० जागा मिळतील असा अंदाज आहे. इंडिया टिव्ही-सीएनएक्स एक्झिट पोलनुसार, तेलंगणात बीआरएस ७० जागा जिंकत सत्तेत परत येईल. काँग्रेसला ३४ जागा मिळतील. भाजपला ७ जागांवर समाधान मानावे लागेल. औवैसींचा पक्ष ७ जागा जिंकू शकतं.जन की बात एक्झिट पोलनुसार , काँग्रेसला ४८ ते ६४ जागा मिळू शकतील. काँग्रेस बीआरएसच्या पुढे जाईल. बीआरएसला ४० ते ५५ जागा मिळू शकतात. तर भाजपला ७ ते १३ जागांवर समाधान मानावे लागेल.सर्वात तरुण असलेल्या राज्यामध्ये काँग्रेस, भारत राष्ट्र समिती आणि भाजप यांच्यामध्ये तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे. तेलंगणामध्ये विधानसभेच्या एकूण ११९ जागांवर उमेदवार मैदानात आहेत. बीआरएसच्या के चंद्रशेखर राव यांना हॅट्रिक करण्याची इच्छा आहे. पण, यावेळी त्यांचा मार्ग खडतर आहे. बीआरएसवर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने पक्ष काहीसा बॅकफूटवर गेला आहे. काँग्रेस राज्यात सत्ता स्थापन करण्यासाठी इच्छूक आहे. तर, कर्नाटकमधील पराभवानंतर भाजपला तेलंगणात सत्ता स्थापन करण्याचा इरादा आहे. -खचखच् प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनीही राज्यात जोर लावला आहे. सीएनएनच्या एक्झीट पोलनुसार -खचखच् ला राज्यात पाच जागा मिळू शकतील.बीआरएसने ११९ पैकी ११९ जागांवर उमेदवार उभे केले होते. तर, काँग्रेसने ११८ जागांवर उमेदवार उभे केले होते. एक जागा सीपीआयसाठी सोडली आहे. भाजप १११ जागांवर निवडणूक लढवत आहे. ८ जागा स्टार पवन कल्याण यांच्या जन सेना पक्षाला सोडल्या आहेत. एक्झिट पोलच्या अंदाजानुसार कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळताना दिसत नाहीये. पण, काँग्रेस सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला आहे.

## ना महागाई ना बेरोजगारी; एक्झिट पोलनुसार, 'या' मुद्द्यावरून झालं मतदान

छत्तीसगडमधील एक्झिट पोलचे अंदाज समोर आले असून यात काँग्रेस पुन्हा एकदा सत्तेत येताना दिसत आहे. खपवळर ढेवरू -ळी चू खपवळर च्या सर्व्हेनुसार भूपेश बघेल यांचेच सरकार पुन्हा राज्यात येईल. मुख्यमंत्री म्हणून भूपेश बघेल यांनाच लोकांनी पसंदी दिल्याचं चित्र आहे.छत्तीसगडमध्ये करण्यात आलेल्या या सर्व्हेमध्ये १६,२७० लोकांचा समावेश करण्यात आला होता. यात ७७ टक्के ग्रामिण भागातील तर २३ टक्के शहरी भागातील मतदार होते. यात ५६ टक्के पुरुष तर ४४ टक्के महिलांचा समावेश होता. लोकांनी या निवडणुकीमध्ये महागाई, बेरोजगारी किंवा आश्वासनांची घोषणा या मुद्द्यावरुन मतदान केलं नाही. तर, आपल्या आवडच्या पक्षाला मतदारांनी मतदान केलं आहे.छत्तीसगडच्या लोकांनी कोणत्या मुद्द्यावर मतदान केलं१. आवडता पक्ष - २० टक्के२. आवडता उमेदवार- १० टक्के३.राज्याच्या विकासासाठी - १० टक्के ४. काँग्रेसकडून शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि धान्य खरेदी- १० टक्के५. सत्ताधारी सरकारचे काम- ९ टक्के६. सत्ता बदल आवश्यक- ८ टक्के७. पंतप्रधान मोदींचा चेहरा- ५ टक्के८.केंद्र सरकारचे काम- ४ टक्के९. मुख्यमंत्री उमेदवार- ३ टक्के१०. मागच्या भाजप सरकारच्या कामामुळे -२ टक्के११. राज्य सरकारच्या योजनेचा लाभ मिळाल्याने- २ टक्के१२. काँग्रेसच्या आश्वासनांमुळे-२ टक्के१३. केंद्र सरकारच्या योजनांच्या लाभामुळे- २ टक्के१४. भाजपच्या आश्वासनांमुळे- २ टक्के

## वायू प्रदूषणामुळे दरवर्षी २० लाख लोकांचा मृत्यू

नवी दिल्ली : भारतात दरवर्षी वीस लाखांहून अधिक लोकांचा वायू प्रदूषणामुळे मृत्यू होतो. एका रिसर्च जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासात ही बाब समोर आली आहे. भारतापेक्षा केवळ चीनमध्येच वायू प्रदूषणामुळे जास्त मृत्यू झाले आहेत. या अभ्यासातून असेही समोर आले आहे की, औद्योगिक क्षेत्र, ऊर्जा उत्पादन आणि वाहतूक इत्यादींमध्ये जीवाश्म इंधनाचा वापर जगभरात दरवर्षी ५० लाखांहून अधिक लोकांच्या मृत्यूचे कारण बनतो.

संशोधकांनी म्हटले आहे की, २०१९ मध्ये केलेल्या मूल्यांकनानुसार, वायू प्रदूषणामुळे जगभरात दरवर्षी ८३ लाख लोकांचा मृत्यू होतो. अशा परिस्थितीत, जीवाश्म इंधनाच्या वापरामुळे होणारे मृत्यू हे एकूण मृत्यूंपैकी ६१ टक्के आहेत जे स्वच्छ आणि अक्षय ऊर्जेच्या वापरामुळे टाळता येऊ शकतात. संशोधकांना असेही आढळून आले की, सुमारे ५२ टक्के मृत्यू इस्केमिक हृदयरोग, स्ट्रोक, क्रॉनिक ऑबस्ट्रक्टिव्ह लंग डिसीज आणि मधुमेह यासारख्या सामान्य परिस्थितींशी संबंधित आहेत. तसेच, सुमारे २० टक्के मृत्यूची प्रकरणे उच्च रक्तदाब, अल्झायमर आणि पार्किन्सन रोग यांसारख्या न्यूरोडीजनरेटिव्ह विकारांशी संबंधित आहेत.

संशोधकांचा असा विश्वास आहे की, जीवाश्म इंधनावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेले देश त्यांचा वापर टाळून दरवर्षी सुमारे ४.६ लाख मृत्यू टाळू शकतात.

# एस.आर.ए. सदनिका हस्तांतरण फी ५०% वर अनेक वर्षाच्या निवाराच्या मागणीला यश

मुंबई/ शहामत शेख

निवारा हक्क सुरक्षा समितीच्याा वतीने अनेक वेळा पत्रव्यवहार व आंदोलनाच्या माध्यमातून शासनाकडे मागणी करण्यात येत होती की एस ए मध्ये सदनिका खरेदी विक्री करताना दोन दोन वेळा फि भरावी लागत असे त्यापैकी एका ठिकाणची हस्तांतरण हस्तांतरण फी माफ करण्यात यावी या मागणीला अंशतः यश मिळालेले आहे आजच्या मंत्रिमंडळातील बैठकीत हस्तांतरण फी एस आर ए कडून फक्त ५० टक्के आकारण्यात येईल असा निर्णय घेतला तसेच दहा वर्ष खरेदी-विक्री करता येत नव्हती यासाठी चा कालावधी आता सात वर्षे करण्यात आला आहे या निर्णयाचे आम्ही सर्व झोपडीधारकांकडून शासनाचे आभार मानतो परंतु एक ठराविक रक्कम जर मान्य केली असती तर सर्व सदनिकाधारकांना मुंबईकरांना याचा आणखी जास्त फायदा झाला असता असे या मागणीचा पाठपुरावा करणारे निवाराचे समन्वयक संजय डावरे यांनी सांगितले. निवाराच्यावतीने अनेक वेळा शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते की एस आर ए परिपत्रक क्रमांक १४५ नुसार खरेदी-विक्री करताना किंवा हस्तांतरण करताना महसूल विभागाकडे देखील पूर्ण स्टॅम्प ड्युटी भरावे लागत असे तेवढीच रक्कम किंवा कमीत कमी एक लाख रुपये ही एसआरएकडे हस्तांतरण पोटी भरावी लागत असे यामुळे जे गरीब झोपडीधारक होते त्यांना घर घेणं जे मजबुरीने विकणार होते दोघांनाही शक्य होत नव्हते प्रत्येक वेळी मिळणाऱ्या आश्वासनाचे आज निर्णयात रूपांतर झाले आहे याचे निश्चित झोपडीधारकांना काही अंशी फायदा होणार आहे. याचबरोबर जागेचा कन्व्हेन्स करून देणे स्ट्रक्चरल ऑडिट करणे विकासाकांनी जबाबदारी घ्यावी अशा विविध मागण्या मान्य होणे बाकी आहे




# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर :- जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी प्रभारी अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये लातूर जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत दि. १ डिसेंबर, २०२३ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते दि. १५ डिसेंबर २०२३ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश धार्मिक सभा, अंत्ययात्रा, विवाह, अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

# प्रफुल्ल पटेल करणार मोठे गौप्यस्फोट! लिहिणार पुस्तक; म्हणाले, माझ्याकडं...



मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसबाबत अनेक मोठे गौप्यस्फोट करण्यासाठी खासदार प्रफुल्ल पटेल तयार आहेत. खुद्द पटेल यांनी हे सांगितलं आहे. माझ्याकडं बोलण्यासाठी खूप काही असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. दिलीप वळसे पाटील यांच्याकडंही खूप काही सांगण्यासारखं असल्याचं पटेल यांनी म्हटलं आहे. सभेला संबोधित करताना पटेल म्हणाले, २ जुलैला आपण सत्तेवर आलो, आपण जे पाऊल टाकलं ते पक्षाचा हितासाठी टाकलं आहे. माझ्याकडं बोलण्यासाठी अनेक मुद्दे आहेत भविष्यात मी देखील पुस्तक लिहिणार आहे, त्यावेळी मी माझी बाजू मांडेल. इथं दिलीप वळसे पाटील देखील बसले आहेत, त्यांच्या देखील पोटात खूप काही दडलं आहे. अनेक गोष्टी त्यांनी पोटात साठवल्या आहेत.आपल्या पक्षाचा प्रवास केवळ विधानसभा लोकसभेपर्यंत नाही पुढील २० ते २५ वर्षे अजित पवार यांच्या नेतृत्वखाली आपल्याला काम करायचं आहे. मी शरद पवार यांच्यासोबत अनेक वर्ष काम केलं आहे. शरद पवार काँग्रेसमधून बाहेर पडले आणि १९८६ मध्ये परत आले. शरद पवार हे कायम प्रवाहासोबत चाललेत आपण देखील प्रवाहासोबत चाललो आहोत, असंही पटेल यांनी म्हटलं. पटेल पुढे म्हणाले, अजित पवार यांच्यासोबत माझे चांगले आणि गोड संबंध होते. मात्र, मी त्यांच्या जवळ नव्हतो कारण मी शरद पवारांच्या जवळ होतो, त्यामुळं अजित पवार यांच्यासोबत मी गेलो त्यावेळी सर्वांना आश्चर्य वाटलं की अजित पवार यांच्यासोबत मी कसा काय? अनेकांना वाटलं यांचं आतून सख्य आहे. आपण अजित पवार यांच्या सोबत जाताना राजकिय भूमिका घेतली होती. आता आपण भुमिका घेतली आहे दादा एके दादा. दादांसोबत जाण्याचा आता निर्णय घेतला आहे.पन्नू हत्येचा कट रचल्याप्रकरणी अमेरिकेच्या कारवाईवर भारताचं मोठं वक्तव्य! म्हटलं, हे कृत्य म्हणजे...सन २००४ साली राष्ट्रवादी नुकतीच जन्माला आली होती. त्यावेळी १६-१६-१६ करत लोकसभा लढण्याचा निर्णय घेतला आणि भाजप सोबत जाण्याचा निर्णय घेतला होता, माझ्या घरी मीटिंग झाली होती. स्वतः प्रमोद महाजन माझ्या घरी होते. अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जसवंत सिंग यांच्या सूचनेनुसार हे झालं होतं. त्यावेळी गोपीनाथ मुंढे यांना वाटलं की आपलं दिल्लीतल महत्त्व कमी होईल त्यामुळे त्यांनी बळासाहेब ठाकरेंना याची माहिती लीक केली आणि त्यामुळं बाळासाहेब ठाकरेंनी आडवी तिढवी टीका केली आणि होणारी युती होऊ शकली नाही.

## मध्य प्रदेशात काँग्रेस-भाजपत 'काँटे की टक्कर'; एक्झिट पोल काय सांगतात?




पाच राज्यांमध्ये झालेल्या निवडणुकांचे एक्झिट पोल जाहीर झाले आहेत. यांपैकी मध्य प्रदेशात काँग्रेसची हवा असल्याचं सांगितलं जात होतं. पण निकाल भलताच लागू शकतो. कारण भाजप आणि काँग्रेसमध्ये इथं काँटे की टक्कर होण्याचा अंदाज एक्झट पोल्सनं वर्तवला आहे. मध्य प्रदेशात एकूण जागा २३० आहेत. यांपैकी बहुमताचा आकडा ११६ आहे. एक्झिट पोलमधून बहुतांश ठिकाणी काँग्रेस बहुमताचा आकडा गाठू शकते असे अंदाज आहेत. पण काही पोल्समध्ये भाजप या बहुमताच्या जवळ असल्याचं दिसून आलं आहे. त्यामुळं मध्य प्रदेशातील निकाल हे रंजक असण्याची शक्यता आहे.

# छत्तीसगडमध्ये काँग्रेसचं उधळणार गुलाल?; स्पष्ट बहुमताचे संकेत

पाच राज्यांमध्ये नुकत्याच विधानसभा निवडणुका पार पडल्या. याचा निकाल ३ डिसेंबर रोजी जाहीर होणार आहे. पण या निवडणुकांच्या मतदानोत्तर चाचण्यांचे कल आता समोर आले आहेत. विविध सर्व्हेमधून काही अपेक्षित तर काही धक्कादायक संभाव्य निकाल समोर आले आहेत. त्यानुसार छत्तीसगडमध्ये काँग्रेस आपली सत्ता राखणार असल्याचं चित्र आहे. छत्तीसगडमध्ये एकूण ९० जागा आहेत. त्यापैकी ४५ हा बहुमताचा आकडा आहे. इंडिया टुडे-एक्सिस माय इंडिया काँग्रेस छत्तीसगडमध्ये बहुमताचा आकडा पार करणार असल्याचं चित्र आहे. या राज्यात काँग्रेसला ४० ते ५० जागा मिळतील असा इंडिया टुडे-एक्सिस माय इंडिया या एक्झिट पोलचा अंदाज आहे. तर भाजपला ३६ ते ४६ जागा मिळतील. तसेच इतर पक्षांकडं १ ते ५ जागा जातील असंही हे एक्झिट पोल सांगत आहेत. इंडिया टीव्ही-सीएनएक्स

इंडिया टीव्ही आणि सीएनएक्सच्या सर्व्हेनुसार, काँग्रेसला छत्तीसगडमध्ये ४६ ते ५६ जागा मिळतील. तर भाजपला ३०-४० जागा तसेच इतर पक्षांना ३-५ जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. एबीपी-सीव्होटर एबीपी-सीवोटरच्या सर्व्हे नुसार, काँग्रेसला ४१ ते ५३ जागा तर भाजपला ३६ ते ४८ अन्य पक्षांना ०- ४ जागांचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.न्यूज २४ - टुडे चाणक्य या संस्थांच्या सर्व्हेनुसार, काँग्रेसला छत्तीसगडमध्ये ५७ जागा मिळतील. भाजपला ३३ तर अन्य पक्षांना ० जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.रिपब्लिक-मॅट्रिजच्या सर्व्हे नुसार, काँग्रेसला ४४ ते ५२ जागा तर भाजपला ३४ ते ४२ जागा आणि अन्य पक्षांना ०-२ जागांवर समाधान मानवं लागेल.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE